महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005






DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781 / 82 / 83
25536712 (OFF)

E-MAIL sscboardpune@gmail.com


क्रमांक पुविम /अ /उमा / 10241
पुणे ४११००५
दिनांक .१४/१०/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,
पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

**विषय : दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.**

**संदर्भ** : १. राज्य मंडळ क्र. संवि/लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी - प्रतिपूर्ती - २६-२७/४०३० दि. २८.९.२०२६ चे पत्र.
२. क्रमांक सं.मं./लेखा/दुष्काळ शुल्क फी माफी/२६-२७/४०४४ दि. २९.९.२०२६ चे पत्र.
३. या कार्यालयचे /लेखा-३/दुष्काळग्रस्त फी माफी/१०२०६ दि. १३.१०.२०२६ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, शासन निर्णय दि. २५ सप्टेंबर २०२६ अन्वये महाराष्ट्र राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी देण्याबाबत नमूद केलेले आहे.

त्यानुसार राज्य मंडळाच्या संदर्भ पत्र-१ व २ नुसार या विभागीय मंडळाने संदर्भ पत्र-३ नुसार आपणास लेखी कळविण्यात आलेले आहे. सदरच्या पत्रात जिल्ह्यातील तालुक्यांचा उल्लेख केलेला असून इ. १० वी व १२ वी च्या परीक्षेचे प्रविष्ट विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे परीक्षा शुल्क न घेता भरून घ्यावीत, असे स्पष्ट निर्देश दिलेले असतानीही . त्याचे काटेकोरपणे पालन होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत .

आपणास सूचित करण्यात येते की , दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क घेऊ नये.काही शाळां व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून जास्त फी /शुल्क घेत असल्याच्या तक्रारी येत आहे हि बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे मंडळाने निश्चित केलेल्या [redacted] फी रकमेपेक्षा जास्त रक्कम घेतल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित शाळेवर कडक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याला फी ची पावती देण्यात यावी .

14/10/26
( वैशाली काळे )
विभागीय सहासचिव
पुणे विभागीय मंडळ ,पुणे